**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 6 No. 18** **March - April - 2025**

# ऊसतोड कामगारांसाठी कल्याणकारी योजना आणि त्यांची अंमलबजावणी

**चेतन जगनसिंग पवार**
*संशोधक विद्यार्थी,*
*गुलाम आझाद समाजकार्य महाविद्यालय.पुसद जि.यवतमाळ*
***Corresponding Author – चेतन जगनसिंग पवार***
**DOI - 10.5281/zenodo.15250552**

***सारांश:***

*भारतातील साखर उद्योगात ऊसतोड कामगारांचे योगदान महत्त्वाचे आहे. हे कामगार स्थलांतरित असून अत्यंत कठीण परिस्थितीत काम करतात. त्यांची सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयक स्थिती सुधारण्यासाठी शासनाने आणि विविध संस्थांनी अनेक कल्याणकारी योजना राबविल्या आहेत. या शोध निबंधात अशा योजनांचा आढावा घेण्यात आला आहे, तसेच त्यांच्या अंमलबजावणीसंदर्भातील अडचणी आणि उपाययोजना यांचा अभ्यास करण्यात आला आहे.*

## प्रस्तावना:

राज्यामध्ये असंघटीत क्षेत्रातील कामगारांची संख्या मोठया प्रमाणात असून या क्षेत्रातील कामगारांचा दारिद्रयरेषेखालील व्यक्तींकरीता असलेल्या कल्याणकारी योजनांमध्ये समावेश नसल्यामुळे तसेच इतर समन्वय नसल्यामुळे आणि त्यांच्याबद्दलची वस्तूनिष्ठ सांख्यिकी माहिती नसल्याने यांच्या साठी विकासात्मक धोरण ठरविने शासनाला कठीन जात आहे. या घटकामध्ये ऊसतोड कामगारांचा समावेश होत असून कामगारांसाठी कायदे, नियम असलेत तरी ऊसतोड कामगारांना याचा फारसा लाभ होत नाही. कामाच्या ठिकाणी कशा प्रकारच्या सुविधा असाव्यात यासंदर्भात ठोस नियम नाहीत, कारखानदारांवर बंधने नाहीत त्यामुळे या घटकाचे मोठ्या प्रमाणात शोषण होत असून त्याचा परिणाम कार्यक्षमतेवर होत असतो ऊसतोड मजूर प्रामुख्याने महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, उत्तर प्रदेश आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये आढळतात. कामाच्या अस्थिरतेमुळे त्यांना कायमस्वरूपी रोजगार मिळत नाही.आरोग्याच्या समस्या, मुलांचे शिक्षण, रहाण्याच्या सोयींची कमतरता आणि आर्थिक असुरक्षितता ही त्यांची प्रमुख संकटे आहेत.

## ऊसतोड कामगार स्थिती:

महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येत 7.64 कोटी लोकसंख्या ही प्रौढ वयागटातील (18 वर्षावरील) आहे. त्यापैकी 3.65 कोटी लोकसंख्या ही असंघटीत क्षेत्रात कार्यरत असून जवळपास 8 लाख लोक ऊसतोडणीच्या कामात गुंतलेले आहे. या ऊसतोड कामगारांची नोंदणी, नोव्हेंबर 2018 पासून प्रारंभ झाली असून 16,000 कामगारांनी नोंदणी केलेली आहे.

## उद्देश:

1. ऊसतोड कामगारांसाठी असलेल्या कल्याणकारी योजनांचा अभ्यास करणे.
2. योजनांच्या अंमलबजावणीतील समस्या/अडचणींचा शोध घेणे.

3. योजनांच्या अंमलबजावणीत सुधारात्मक उपाय सुचवणे

**संशोधन पद्धत:**

या संशोधन निबंध साठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला असून दुय्यम स्त्रोताच्या आधारे माहितीचे संकलन करण्यात आले आहे, यामध्ये पुस्तके संशोधन लेख शासकीय अशासकीय संस्थेचे अहवाल धरणात्मक दस्तऐवज आणि वृत्तपत्रातील विश्लेषणात्मक लेख यासारख्या स्त्रोतांचा समावेश आहे

**प्रमुख कल्याणकारी योजना:**

- लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ मार्फत विम्याची सुविधा करण्यात आलेली आहे तसेच ऊसतोड कामगारांना ओळखपत्र सुद्धा देण्यात येते.
- ऊसतोड कामगाराच्या मुला मुलीसाठी भगवान बाबा वस्तीगृह योजना सुरू करण्यात आलेली आहे
- महात्मा फुले आरोग्य जण योजना या योजनेअंतर्गत ऊसतोड कामगारांना आरोग्याच्या सुविधा मिळण्यासाठी या योजनेचा लाभ घेता येतो या योजनेअंतर्गत खाजगी रुग्णालयामध्ये सुद्धा पाच लाखापर्यंत लाभ मिळू शकते.
- ऊसतोड कामगारांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडे नोंदणी केलेल्या आरोग्य सेवा पुरविण्यासाठी मान्यताप्राप्त असलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून मोबाईल क्लिनीक सुविधा पुरविण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
- महामंडळाचे कामकाज पुर्ण क्षमतेने सुरु झाल्यानंतर महामंडळामार्फत ऊसतोड कामगारांसाठी विद्युत संचलित कोयता, लहान ट्रॅक्टर, ट्रॉली पुरविण्याबाबत तसेच ज्या वैयक्तिक लाभधारकाने बँकेकडून कर्ज घेवून यंत्र व अवजारांची खरेदी केली आहे अशा वैयक्तिक लाभार्थींच्या अनुदानाची रक्कम त्यांच्या कर्ज खात्यावर जमा करण्याबाबतची योजना राबविण्याबाबतचा मानस आहे.
- कामगारांच्या नोंदणीसाठी वेब व मोबाईल ॲप्लिकेशन माहिती व तंत्रज्ञान महामंडळ (महाआयटी) मार्फत करण्यासाठी शासन स्तरावरुन मान्यता देण्यात आली आहे. सदर वेब/मोबाईल ॲप्लिकेशनचे काम जवळपास पुर्णत्वास आले असून अंतिम टप्प्यात आहे.
- गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाचा आकृतिबंध वित्त विभागास सादर केला असता वित्त विभागाने आकृतिबंधात सुधारणा सुचविल्या आहेत. त्यानुसार आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
- अपघातात मृत्यू झालेल्या अथवा अपंगत्व आलेल्या ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादमास व त्यांच्या कुटूंबास आर्थिक लाभ देण्याकरिता महाराष्ट्र राज्यातील सहकारी व खाजगी साखर कारखान्यांच्या अंतर्गत असलेल्या परंतु महाराष्ट राज्याचे रहिवासी असलेले
- अपघातात मृत्यू झालेल्या अथवा अपंगत्व आलेल्या ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादमास व त्यांच्या कुटूंबास आर्थिक लाभ देण्याकरिता महाराष्ट्र राज्यातील सहकारी व खाजगी साखर कारखान्यांच्या अंतर्गत असलेल्या परंतु महाराष्ट राज्याचे रहिवासी असलेले सर्व ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम झोपडी व बैलजोडी यांच्याकरीता दिनांक 10 ऑक्टोंबर, 2024 रोजीच्या शासन निर्णयान्वये "गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजना" राबविण्यात येत आहे.
- सामूहिक गृहनिर्माण योजना: ऊसतोड मजुरांसाठी शासकीय वस्तीगृह योजना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**अंमलबजावणीतील अडचणी:**

योजनांविषयी जागरूकतेचा अभाव - ऊसतोड कामगारांमध्ये अशिक्षित प्रमाण मोठ्या प्रमाणात असून जेमतेम शिक्षणाचे हे बारावी आहे. योजनेविषयी जागरूकता व जनजागृती होत नसल्यामुळे शासनाच्या विविध योजना असून सुद्धा त्यांना या योजनेचा योग्य प्रमाणे लाभ मिळत नाही.

स्थलांतरामुळे लाभ मिळण्यात येणाऱ्या अडचणी :- स्थलांतरामुळे विविध अडचणींना तोंड द्यावे लागते स्वस्त धान्य दुकानांमधून धान्य मिळण्यासाठी अडचण असो केवळ प्रसंगी विविध शासकीय कामाकरिता लागणारी कागदपत्रे हे वेळेत उपलब्ध होत नाही.प्रशासनातील विलंब आणि भ्रष्टाचार,स्थानिक ठेकेदार व साखर कारखानदारांकडून होणारे शोषण

**उपाय आणि सुधारणा:**

- माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून कामगारांची नोंदणी करणे
- स्थलांतरित कामगारांसाठी पोर्टेबल कल्याण योजना विकसित करणे
- स्वयंसेवी संस्था आणि शासन यांच्यातील समन्वय वाढविणे
- योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र देखरेख यंत्रणा स्थापन करणे
- अंमलबजावणीत पारदर्शकता आणणे .कामगारांच्या मुलांसाठी शिक्षण आणि आरोग्य सुविधा वाढवणे. स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे योजनांचा प्रभावी पाठपुरावा करणे

**निष्कर्ष:**

ऊसतोड कामगारांसाठी उपलब्ध योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी शासन, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक प्रशासन यांचा समन्वय आवश्यक आहे. योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे ऊसतोड कामगारांचे जीवनमान सुधारण्यास मदत होईल. शासनाने तसेच सामाजिक संस्थांनी या दिशेने अधिक ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

**संदर्भसूची:**


1. आगलावे, प्रदिप. (2000). सांशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे नागपूरः विद्या प्रकाशन, पृ.301,368
2. भांडारकर, पु.ल. (1999). सामाजिक संशोधन पद्धती. औरंगाबादः वसंत पिंपळापूरे, पृ. 126
3. Bhapkar D.G. & Patil S.D. (nd.) Sociao Economic condition of bulloek-cartmen transporting Sugarcane to Krishna Shakari Sakhar Karkhana Ltd. Rethare (B.K) in Satars Distirct Mharashtra" Maharashtra Sugar 1974, Page No 73 to 91
4. Chide, B.M.(1986). Sociological Study of Migrant Labour in Sugar Mills.Ph.D. Thesis, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad
5. चव्हाण, सुनिता. (1994). उसतोडणी मजुरांच्या समस्या, संदर्भः विघ्नहर सहकारी साखर कारखाना जुन्नर, पुणे. एम.फिल. प्रबंध, श्रीमती नाथीबाई दामोदर महिला विदयापीठ, मुंबई.
6. गुरु, गोपाळ (1989). महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाना धंदा व साखर कामगार चळवळ एक अभ्यासः ऑक्टोबर
7. जोशी लक्ष्मणशास्त्री (2020). मराठी विश्वकोष. मुंबई महाराष्ट्र राज्य विश्वकोष निर्मिती मंडळ.